लोकमत पा.नं.५.

लोकसत्ता पा.नं.३.

# पाकिस्तानी नागरिक बोटीत असल्याची अफवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन येथील जलराणी मासेमारी बोटीत कोणीही पाकिस्तानी नागरिक नसून ती केवळ अफवाच असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही बोट शनिवारी रात्री सव्वानऊच्या सुमारास उत्तन समुद्र किनारी नाखवा व खलाशांसह परतली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी नौदलाच्या बोटीला समुद्रात या मच्छीमार बोटीबाबत संशय आल्याने त्यांनी तटरक्षक दलास कळवले. मुंबई आणि पालघर किनारपट्टीपासून ४४ नॉटिकल मैलावर तटरक्षक दलाने उत्तनच्या मोठा गाव येथील जलराणी मच्छीमार बोट शनिवारी पकडली.. बोटीत बेन्हार जॉनी बुटी हे नाखवा, त्यांचा मुलगा व खलाशी असे १५ जण होते. त्यांची पडताळणी करण्यासाठी यलो गेट पोलिसांना कळवण्यात आले. तेथून उत्तन पोलिसांकडे विचारणा केल्यावर पोलिसांनी नखावाच्या घरी जाऊन तसेच मच्छीमारांच्या संस्थेकडे चौकशी केली. दरम्यान, या बोटीत पाकिस्तानी नागरिक आढळल्याची अफवा पसरली होती. उत्तन मच्छीमार विकास सहकारी संस्थेचे अध्यक्ष लिओ कोलासो यांनी माहिती चुकीची असल्याचे सांगितले.

## जलराणी बोटीशी संपर्क

- जलराणी बोटीत मच्छीमार नाखवा व खलाशी हे भारतीयच असून त्यांच्याकडे आधार कार्ड आहेत, असे कोलासो यांनी सांगितले.
- समुद्रात जलराणी बोट संपर्काबाहेर असल्याने त्या भागात असलेल्या निर्गम या बोटीवरून जलराणी बोटीशी संपर्क साधण्यात आला व उत्तन किनारी तिने परतावे अशा सूचना दिल्या गेल्या.
- ही बोट शनिवारी रात्री उत्तन समुद्रकिनारी आल्यावर उत्तन सागरी पोलिस व कोलासो आदींनी नाखवा आणि खलाशी यांच्याकडे घडलेल्या प्रकाराची चौकशी केली.

# दंगल प्रकरणी आणखी चौघांना पोलिस कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीरामनवमीच्या आदल्या रात्रीच्या किराडपुऱ्यातील दंगलीच्या घटनेत विशेष तपास पथकाने शनिवारी आणखी चौघांना अटक केली. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए. एस. वानखेडे यांनी त्यांनी ३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत सुनावली आहे. सहायक सरकारी वकील समीर बेदरे यांनी सरकारतर्फे काम पाहिले.

इमरान खान बिस्मिल्ला खान (३४, रा. बायजीपुरा), सय्यद कलीम सय्यद सलीम (२२, रा. रहेमानिया कॉलनी), करीम सलीम शेख (२६, रा. गल्ली क्र. चार, संजयनगर) आणि अन्वर खान कादर खान उर्फ सोनू (२८, रा. किराडपुरा) अशी आरोपींची नावे आहेत. याच गुन्ह्यात आठ जणांना यापूर्वीच ३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्यात एकूण बारा जण कोठडीत आहेत.

# भाईंदरमधील भरकटलेली मासेमारी बोट सुरक्षित

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** तटरक्षक दलाने शनिवारी दुपारी ताब्यात घेतलेली संशयास्पद बोट भाईंदरमधील उत्तन येथील मच्छिमारांची असल्याचे स्पष्ट झाले. या बोटीत दोन पाकिस्तानी नागरिक असल्याचे वृत्त पसरल्याने खळबळ उडाली होती. मात्र, तपासानंतर ही अफवा असल्याचे स्पष्ट झाले. ही बोट भरकटली होती.

मुंबई आणि पालघर किनारपट्टी भागात शनिवारी दुपारी तटरक्षक दलाने एक बोट ताब्यात घेतली. त्यांच्यामध्ये पाकिस्तानी नागरिक असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. मात्र अधिक तपासात ही बोट भाईंदरमधील उत्तन येथील असल्याचे स्पष्ट झाले. 'जलराणी' असे या बोटीचे नाव असून ती बेन्हार जॉनी बुटी यांच्या मालकीची आहे.

मासेमारीसाठी खोल समुद्रात गेल्यानंतर या बोटीचा संपर्क तुटला होता. या बोटीत बोटीचे मालक, त्याचा मुलगा आणि १३ खलाशी होते.

तटरक्षक दलाने चौकशी केल्यानंतर बोट भाईंदरकडे पाठण्यास संमती दिली.

Scanned with CamScanner

म-टा- पा-नं.१४

# बिहारमध्ये शोभायात्रेनंतर धार्मिक तणाव

**वृत्तसंस्था, पाटणा/सासाराम (बिहार)**

रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेनंतर धार्मिक दंगल उसळल्याने बिहारच्या सासाराम व बिहार शरिफ या शहरांमध्ये पोलिसांनी जमावबंदी लागू केली आहे. गुरुवारी रात्रीपासून सुरू झालेल्या या दंगली शुक्रवारी दिवसभर धुमसत होत्या. पोलिसांनी या प्रकरणी आत्तापर्यंत एकूण ४५ जणांना अटक केली असून सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे, असे पोलिस अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. काही जण राज्यात धार्मिक तणाव निर्माण करू पाहत आहेत, अशी टीका बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी शनिवारी केली. तर, बिहारमधील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचा आरोप भाजपने केला.

रोहतास जिल्ह्याचे मुख्यालय असणाऱ्या सासाराममध्ये या शोभायात्रेनंतर दंगल उसळली. 'शाहजलाल पिर, सोनापट्टी, कादिरगंज आणि नवरत्न पिर या परिसरात अनेक दुकाने व वाहनांना आग लावण्यात आली. तसेच, संतप्त जमावाने मोठ्या प्रमाणात दगडफेक केली,' अशी माहिती उपविभागीय दंडाधिकारी मनोजकुमार यांनी दिली. या दगडफेकीत अनेक नागरिक तसेच, दोन पोलिस कर्मचारी जखमी झाले. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलिस तैनात करण्यात आले आहेत. नितीशकुमार यांचा मूळ जिल्हा असणाऱ्या असणाऱ्या नालंदाच्या बिहार शरिफमध्येही असाच प्रकार घडला. गगन दीवान, मन्सूरनगर आणि नबीनगर या परिसरात जाळपोळ व दगडफेकीच्या घटना घडल्या. यामध्ये १० जण जखमी झाले. तर, डझनाहून अधिक वाहने व दुकानांची नासधूस झाली. आम्ही नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे. 'आम्ही सीसीटीव्ही फूटेजही पाहत असून यामागे कोण आहे, याचा शोध घेतला जात आहे,' अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



### ४५ जणांना अटक

या दंगलींप्रकरणी आत्तापर्यंत एकूण ४५ जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती राज्याच्या पोलिस मुख्यालयातर्फे देण्यात आली. सासाराम व बिहार शरिफ येथील परिस्थिती आता पूर्वपदावर आली आहे. सासाराम येथे १८ तर, बिहार शरिफ येथे २७ दंगेखोरांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### 'या घटना नैसर्गिक नाहीत...'

नितीशकुमार यांनी याप्रकरणी भाजपवर नाव न घेता टीका केली. या दंगली अस्वस्थ करणाऱ्या आहेत. तेथे आत्तापर्यंत असे कधीही घडले नव्हते. या घटना नैसर्गिक नाहीत. 'गडबड' करू पाहणारे काहीजण यामागे असून राज्यातील धार्मिक सौहार्द ते बिघडवू इच्छित आहेत. परंतु आम्ही ते होऊ देणार नाही, असे नितीशकुमार म्हणाले.

### शहा यांचा दौरा रद्द

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दंगलग्रस्त सासारामचा पूर्वनियोजित दौरा रद्द केला आहे. मात्र शहा हे शनिवारी संध्याकाळी पाटणा येथे येत असून त्यांचा उर्वरीत बिहार दौरा ठरल्यानुसार होईल, असे प्रदेश भाजपतर्फे सांगण्यात आले.

### सिबल यांचीही टीका

पुढील वर्षीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धार्मिक हिंसा, द्वेषपूर्ण वक्तव्ये, अल्पसंख्याकांना सहेतूक त्रास देणे, केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमांतून विरोधकांना लक्ष्य करणे हे विषय भाजपच्या कार्यक्रमपत्रिकेवर आहेत, असा आरोप राज्यसभेचे खासदार कपिल सिबल यांनी केला.

Scanned with CamScanner

सामना पा.नं.१.

## दोन महिने तापाचे... कोरोनासोबत तापमानही वाढणार

# तोंडाला मास्क आणि डोक्यावर छत्री हवीच!

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) – कोरोना रुग्णसंख्या संपूर्ण एप्रिलसह मेअखेरपर्यंत वाढणार असल्याचा इशारा आरोग्य तज्ज्ञांकडून दिला गेला असतानाच भारतीय हवामान विभागानेही पुढील दोन्ही महिने सूर्य आग ओकणार असल्याचा अलर्ट जाहीर केल्याने टेन्शन वाढले आहे. त्यामुळे पुढील दोन महिने 'तापा'चे राहणार असून कोरोनापासून वाचण्यासाठी 'तोंडाला मास्क' आणि उन्हापासून वाचण्यासाठी 'डोक्यावर छत्री' अशीच स्थिती राहणार आहे.

### पारा चाळिशी पार करणार

हवामान खात्याने दिलेल्या अलर्टनुसार पुढील दोन महिन्यात अनेक वेळा तापमान ४० अंश सेल्सिअसचा आकडा पार करणार आहे. महाराष्ट्रासह गुजरात, बिहार, झारखंड, पूर्व उत्तर प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, पंजाब आणि हरयाणा अशा विविध नऊ राज्यांत उष्णतेची लाट धडकणार आहे.




### अशी घ्या काळजी

प्रखर उन्हात घराबाहेर पडू नका

सुती कपडे, टोपी, छत्रीचा वापर करा

पचण्यास जड पदार्थ खाणे टाळा

पुरेसे पाणी, सरबत, नारळपाणी प्या

### काही राज्यांत पाऊस

हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार काही राज्यांमध्ये पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उन्हापासून बचाव करण्यासाठी छत्री घेऊन फिरताना याच छत्रीचा वापर पावसापासून वाचण्यासाठी करावा लागण्याची शक्यता आहे.

### सलग तिसऱ्या दिवशी तीन हजारांच्या घरात

सलग तिसऱ्या दिवशी देशात तीन हजारांच्या घरात कोरोना रुग्णसंख्या नोंदवली गेली. देशात गेल्या २४ तासांत २९९४ रुग्ण नोंदवले गेले. तर महाराष्ट्रात ६६९ तर मुंबईत १८९ रुग्णांची नोंद झाली.


### नौदलप्रमुखांना कोरोना

देशाचे नौदलप्रमुख ॲडमिरल हरी कुमार यांना कोरोनाची लागण झाली आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भोपाळमधील कॉन्फरन्सआधी त्यांच्या सुरक्षेसंबंधित कर्तव्यावर असणाऱ्या १३०० कर्मचारी-अधिकाऱ्यांची कोरोना चाचणी केली असता २२ जणांना लागण झाल्याचे समोर आले.

सकाळ पु.पा.३.

# वसईतील भूमाफियांचे धाबे दणाणले

## सर्वपक्षीयांकडूनं अनधिकृत बांधकामे तोडण्याची मागणी



विरार, ता. १ (बातमीदार) : वसई-विरारमधील अनधिकृत बांधकामाचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी राज ठाकरे यांची सभा झाल्यानंतर माहीमच्या दर्ग्याचे बांधकाम शासनाने तात्काळ पाडले. त्यानंतर आता वसई-विरारमधील अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी मनसे आक्रमक होण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे येथील भूमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

मागच्या वेळी बोयदापाडा येथील अनधिकृत बांधकामे राज ठाकरे यांच्या सभेनंतर पाडण्यात आली होती. आतासुद्धा वसईतील मनसे या अनधिकृत बांधकामांविरोधात आक्रमक झाली असून त्यांनी अनधिकृत बांधकामांबाबत तक्रारी केल्या आहेत. त्याचबरोबर अनधिकृत बांधकामे वाचवणाऱ्या पालिकेतील कर्मचाऱ्यांच्या चौकशीची मागणी केली आहे.

वसईमधील राजकीय पक्षही अनधिकृत बांधकामे तोडण्याची मागणी प्रशासनाकडे करत आहेत. वसई-विरारच्या अनधिकृत बांधकामांचा प्रश्न न्यायालयातही गाजत आहे. पालिका प्रशासनाने पालिका हद्दीत जवळपास १० हजार बांधकामे असल्याचे सांगितले होते. वन विभागाच्या दुर्लक्षामुळे येथील डोंगरच भूमाफियांनी पोखरले आहेत. पालिकेने त्यावर कारवाई सुरू केली असली तरी ती कासव गतीने सुरू आहे.



अनधिकृत बांधकामांविरोधात पालिका प्रशासनाची कारवाई सातत्याने सुरू आहे. अनेक अनधिकृत बांधकामे पालिकेने उद्ध्वस्त केली आहेत. अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत कठोर कारवाई करण्यात येईल.

- अनिलकुमार पवार, आयुक्त, वसई-विरार महापालिका

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५.११.१.

# कारभार सुधारा, नाहीतर निलंबनाची कारवाई होणार

## आ. सरनाईक यांचा अधिकाऱ्यांना इशारा

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये सुरू असलेल्या उपनिबंधक कार्यालयात कामकाज व्यवस्थित होत नसल्याबाबत शेकडो नागरिकांच्या तक्रारी आहेत. कामासाठी आलेल्या नागरिकांना उपनिबंधक. कार्यालयातून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. उलट खुलेआम भ्रष्टाचार सुरू आहे. याबाबत आ.प्रताप सरनाईक यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे अचानक आ. सरनाईक हे आ. गीता जैन यांच्यासह मीरा-भाईंदरच्या उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयात पोहोचले आणि अधिकाऱ्यांना त्यांनी फैलावर घेतले. जर यापुढे पारदर्शक कारभार झाला नाही आणि उपनिबंधक कार्यालयाचा कारभार सुधारला नाही, तर या भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करून जेलमध्ये पाठवण्यात येईल, असा इशारा आ. सरनाईक यांनी दिला. अचानक दोन्ही आमदारांनी या कार्यालयात धडक दिल्याने कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची भंबेरी उडाली व या कार्यालयात सुरू असलेला गलथान कारभार चव्हाट्यावर आला.

मीरा-भाईंदर शहरात ६ हजारांपेक्षा जास्त हाऊसिंग सोसायट्या आहेत. अनेक सोसायट्यांच्या आमच्याकडे तक्रारी येत होत्या. या कार्यालयातून न्याय मिळत नाही. येथील कर्मचारी भ्रष्टाचार करून निर्णय देतात. नियमांचे उल्लंघन करून सोसायट्यांबाबत निर्णय होतात, अशा लोकांच्या तक्रारी होत्या. त्यामुळे या तक्रारींची दखल घेऊन आ. प्रताप सरनाईक यांच्यासह आ. गीता जैन हे उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयात अचानक दुपारी कोणतीही पूर्वसूचना न देता पोहोचले. या कार्यालयात पोहोचले असता, तिथे ३-४ खासगी कर्मचारी कार्यालयात काम करत असल्याचे दिसून आले. त्यांना आ.



सरनाईक यांनी विचारले असता, ते खासगी कर्मचारी असल्याचे स्पष्ट झाले. शासकीय कार्यालयात अशा पद्धतीने खासगी कर्मचारी कामाला ठेवणे पूर्णपणे चुकीचे व गैर आहे. चुकीचे निर्णय देऊन जो भ्रष्टाचार होतो त्या पैशातून खासगी कर्मचाऱ्यांचा पगार निघतो का? असा सवाल करण्यात आला. त्यानंतर उपनिबंधक देवकते यांना आमदारांनी फैलावर घेतले. उपनिबंधक म्हणून तुम्ही नागरिकांच्या समस्या सोडवत नाहीत. इथे आल्यानंतर सगळा भोंगळ कारभार गलथानपणा गोंधळ दिसला. लोकांकडून पैसे गोळा करतात आणि उरलेले पैसे तुम्हाला देतात का? तुमच्या विषयी एवढ्या तक्रारी आहेत देवकाते, तुमचा कारभार सुधारा. लोक इथे अपेक्षेने येतात पण तुम्ही त्यांना न्याय देत नाही. असे सांगत आ. सरनाईक यांनी संताप व्यक्त केला. मीरा-भाईंदरचे उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय येथून आतापर्यंत अनेक सोसायट्यांबाबत चुकीचे निर्णय दिले आहेत. जर चुकीचे व नियमबाह्य निर्णय दिले असतील तर त्या तपासून रद्द करा. कोणावरही अन्याय करू नका. सर्वसामान्य जनतेला त्रास देण्याचा प्रयत्न केला तर आमच्या शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यास भाग पाडू नका, असा इशारा आ.सरनाईक यांनी दिला. मीरा-भाईंदरच्या सर्वसामान्य जनतेला न्याय अपेक्षित आहे. मीरा-भाईंदरमधील कोणत्याही हाऊसिंग सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांची आमच्याकडे तक्रार येता कामा नये. या कार्यालयात दलाल लोकांना इकडे बसवू नका. नियमानुसार काम करा. असे आ. सरनाईक यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक : ०१६ | शनिवार ०१ एप्रिल २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने ०४

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या कारवाईने दोन महिलांची सुटका

**वसई.** वेश्याव्यवसायाला चिथावणी देणाऱ्या आरोपींना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा पथकाला यश आले असून, दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. डीसीपी (गुन्हे) अविनाश अंबुरे आणि एसीपी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी तस्करी कक्षाचे पोलीस अधिकारी-कर्मचारी, नालासोपारा पीआय संतोष चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, अनैतिक मानवी तस्करी कक्षा, नालासोपारा यांना २९ मार्च रोजी वेश्याव्यवसायात (१) हरेश्वर केशव राऊत (२५) गुंडम्मा रामप्पा भांगी उर्फ राजश्रीने महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग



पाडल्याची माहिती मिळाली. महिला पुरवण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या ग्राहकांना बोलावून त्या बदल्यात पुरुष ग्राहकांकडून पैसे घेतात. मिळालेल्या माहितीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने नालासोपाऱ्याचे पीआय संतोष चौधरी यांनी कायदेशीर कारवाई केली आहे.या प्रकरणाची पूर्तता केल्यानंतर, पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुंगारेश्वर फाटा, वसई पूर्व येथे पोलीस कर्मचाऱ्यांनी बोगस ग्राहक व दोन पंचांसह छापा टाकला, त्यावेळी आरोपी (१) हरेश्वर केशव राऊत, रा. चिखल डोंगरी, विरार पश्चिम आणि (२) गुंडम्मा. याप्रकरणी राणाप्पा भांगी उर्फ राजश्री, रा.अंधेरी मुंबई याला ताब्यात घेण्यात आले असून, या प्रकरणी पोलीस हवालदार बापू पवार यांनी आरोपीविरुद्ध कलम ३७०(१)(३), ३४ कम अनैतिक वाहतूक नुसार पेल्हार पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे. प्रतिबंध कायदा १९५६, कलम ४,५. पोलीस अधिक तपास करत आहेत.

Scanned with CamScanner

दैनिक
मुंबई केसरी टाइम्स
R.N.I. NO MAHHIN/2008/25162
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : 293 शनिवार ०१ एप्रिल २०२३ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/249/2023/2025 पृष्ठ : 04

# अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा की कार्रवाई, दो महिलाओं को कराया आजाद

**वसई ;** देह व्यापार को उकसाने वाले आरोपियों की गिरफ्तारी एवं दो पीड़ित महिलाओं को छुड़ाने में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा टीम को सफलता मिली है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा पी.आई संतोष चौधरी के नेतृत्व पुलिस अधिकारी-कर्मचारी की टीम ने की है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि २९ मार्च को अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा को गुप्त सूचना मिली कि वेश्या दलाल (१).हरेश्वर केशव राउत (२).गुंडम्मा रामप्पा भांगी ऊर्फ राजश्री ये महिलाओं को पैसे का लालच देते हैं व वेश्यावृत्ति के लिए महिलाओं को उपलब्ध कराने के लिए अलग-अलग ग्राहकों को अलग-अलग जगहों पर आमंत्रित करते हैं व बदले में.पुरुषों ग्राहको से भुगतान मिलता है.मिली सूचना के आधार पर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा के पी.आई संतोष चौधरी ने कानूनी मामलों को पूरा करने के बाद पुलिस स्टॉफ. बोगस ग्राहक और दो पंचों के साथ पेल्हार पुलिस स्टेशन की सीमा के भीतर तुंगारेश्वर फाटा. वसई पूर्व में छापा मारा.इस दौरान आरोपी (१).हरेश्वर केशव राउत.निवासी-चिखल डोंगरी.विरार पश्चिम व (२).गुंडम्मा रानप्पा भांगी ऊर्फ राजश्री.निवासी-अंधेरी मुंबई को हिरासत में लिया और उनके द्वारा अपराध में प्रयुक्त रिक्शा भी शामिल कुलमिलाकर ०१.०२.६७० रुपये का माल जप्त किया गया है तथा दो पीड़ित महिलाओं को देह व्यापार से मुक्त कराया गया है।

उक्त मामले में पुलिस हवलदार बापू पवार द्वारा पेल्हार थाने में आरोपियों पर कलम ३७० (१)(३). ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कानून १९५६ कलम ४.५ के तहत एफआईआर दर्ज करवाया है।आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

Scanned with CamScanner

लोकमत

# अमली पदार्थ पिणारे अटकेत

नालासोपारा : पेल्हार पोलिसांनी शुक्रवारी सकाळी गावराई पाडा नाका आणि पांडेनगर परिसरात अमली पदार्थ पिणाऱ्या तीन आरोपींना पकडले आहे. अभिषेक रवींद्र राजभर (१८), अमन ब्रिजेश जैस्वार (१९) आणि आशिष शंकर गुप्ता (१९) अशी पकडलेल्या तीन आरोपींची नावे आहेत. पेल्हार पोलिसांनी वेगवेगळे तीन गुन्हे दाखल केले आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 02, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# पोलिस भरतीसाठी लेखीची तयारी झाली का?



मंगेश कराळे। लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पोलिस शिपाई पदाची लेखी परीक्षा २ एप्रिल रोजी भाईंदर येथील दोन परीक्षा केंद्रांवर घेतली जाणार आहे. १२ हजार १२४ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. पोलिस शिपाई पदावर आपली निवड व्हावी, यासाठी मैदानी परीक्षा आटोपल्यानंतर पात्र ठरलेले उमेदवार लेखी परीक्षेची जोमाने तयारी करीत असल्याचे दिसून येत आहे. पोलिस भरतीची लेखी परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, तटस्थपणे, निपक्षपातीपणे पार पाडण्याकरिता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

## ९८६ पदांसाठी भरती

पोलिस शिपाई पदाच्या एकूण ९८६ जागा आहेत. लेखी परीक्षेसाठी सुमारे १२ हजार १२४ उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यांची आज रविवारी २ एप्रिलला परीक्षा होईल.



## मैदानी चाचणी पूर्ण

आयुक्तालयातील पहिली पोलिस भरती शारीरिक चाचणी २ जानेवारी पासून भाईंदर (प.) येथील नेताजी सुभाषचंद्र बोस या मैदानात पोलिस बंदोबस्तात व इन कॅमेरा पार पडली. त्याची सांगता २२ फेब्रुवारीला झाली.

## आता रविवारी लेखी परीक्षा

उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी सकाळी साडे आठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान पुरुष उमेदवारांसाठी भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व महिला उमेदवारांसाठी भाईंदरच्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान येथे घेण्यात येणार आहे. पोलिस शिपाई लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवारी सकाळी ५ वाजता हजर राहण्याचे आवाहन केले आहे.

## परीक्षेला जाताना ही कागदपत्रे जवळ ठेवा

प्रवेशपत्र डाऊनलोड करून स्पष्ट दिसेल, अशी प्रिंट काढावी. तसेच पासपोर्ट साईज २ कलर फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स सोबत आणणे बंधनकारक आहे.

## कोणतेही इलेक्ट्रिक यंत्र बाळगू नये

उमेदवारांनी मोबाइल, डिजिटल वॉच, गणकयंत्र, ब्लूटूथ, हेडफोन व इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास कारवाई केली जाईल.

Hello Vasai
Page No. 2 Apr 02, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# काशिमीरा पुलिस को मिली सफलता ; चोरी कर फरार शातिर चोर नालासोपारा से धर दबोचा गया



अजहर शेख : संवाददाता

*वसई ;* घरफोडी चोरी करने वाला शातिर चोर को काशिमीरा पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने १० घंटे के अंदर खोजकर २३ लाख से अधिक का माल जप्त करने में सफलता अर्जित की है। यह कार्रवाई सी.पी मधुकर पांडेय व अतिरिक्त पुलिस कमिश्नर श्रीकांत पाठक के आदेशानुसार परिमंडल १ डीसीपी जयंत बजबले व एसीपी विलास सनाप के मार्गदर्शन में पी.आई संदीप कदम व क्राइम पी.आई विजय पवार की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने बुधवार को दी है, पुलिस ने बताया कि शिकायतकर्ता अकबर अली मोहम्मदअली चुडीहार, निवासी-बि.नं.६,डी.बी. ओझोन ठाकुर मॉल के पास, काशिमीरा, मिरारोड पुर्व में रहता है। २३ मार्च व २६ मार्च के दरम्यान शिकायतकर्ता अकबर रमजान के मौके पर चंद्र दर्शन के लिए मुंबई के गोरेगांव गया था, तभी अज्ञात चोर ने घर की खिड़की ग्रिल को काटकर, घर में घुसकर घर में रखा लकड़ी और लोहे की अलमारी से कुल २९३ ग्राम वजन (१४,६५,००० रुपये) सोने के आभूषण, एक किलो वजन ७०,००० रुपये चांदी का आभूषण व ०९,००,००० रुपये नगदी चोरी कर फरार हो गए। इस मामले में अकबर ने काशिमीरा थाने मे अज्ञात चोर के खिलाफ एफआईआर दर्ज करवाया।पुलिस अधिकारी ने कहा कि, उक्त अपराध में अज्ञात अभियुक्तों का पता लगाकर अपराध का पर्दाफाश करने के संबंध में वरिष्ठ पी.आई संदीप कदम ने क्राइम डिटेक्शन टीम में एपीआई प्रशांत गांगुर्डे को आदेश दिया, उक्त अपराध में अभियुक्तों की अपराध प्रक्रिया से ऐसे अपराध करने वाले अपराधियों के बारे में जानकारी प्राप्त हुई, गुप्त प्राप्त सूचना के आधार पर आरोपी अब्दुल शेख ऊर्फ अब्दुल चिरा,(उम्र ४६ वर्ष, रा.रुम नं २११, आदर्श निवास, अलकापुरी, आचोला क्रॉस रोड, नालासोपारा) ने उक्त अपराध किया है, पुलिस ने कहा कि, वह एक राज्य में भागने के लिए तैयार था, एपीआई प्रशांत गांगुर्डे और उनकी टीम ने नालासोपारा रेलवे स्टेशन क्षेत्र में जाल बिछाया और आरोपी को गिरफ्तार कर लिया। पुलिस ने बताया कि उक्त गिरफ्तार आरोपी के पास से मौके पर ही अपराध की चोरी की राशि में से ०७,७५,७००/- नकद बरामद किया गया,साथ ही, जांच के दौरान १४,६५,०००/- रुपये मूल्य के २९३ ग्राम सोने के आभूषण और ७०,०००/- रुपये मूल्य के ८५० ग्राम चांदी के आभूषण भी चोरी का माल, यानी कुल मिलाकर २३,१०,००० रुपये का माल जब्त किया गया है। उपरोक्त आरोपी ऑन रिकॉर्ड आरोपी है और उसके विरुद्ध मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर राज्य-राजस्थान क्षेत्र में चोरी के ४० से अधिक मामले दर्ज हैं, अपराध किए जाने के समय, आरोपी ने बिना कोई तकनीकी या भौतिक साक्ष्य छोड़े अपराध किया था, लेकिन अपराध करने के तौर-तरीकों का अवलोकन किया था। गुप्त मुखबिर से मिली सूचना के आधार पर काशिमीरा थाने की क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों व कर्मचारियों ने मामला दर्ज होने के महज १० घंटे के भीतर ही आरोपी को गिरफ्तार कर लिया है।

Scanned with CamScanner